# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

(Govt. of Maharashtra Undertaking)


जा.क्र. मप्राशिप/सशिअ/प्र/सकाअ/२०१३-१४/१५८८ दिनांक:- 18 APR 2013

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

२) शिक्षणाधिकारी (प्राथ. व माध्य)
जिल्हा परिषद, सर्व.

३) शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका, सर्व.

४) शिक्षण निरिक्षक,
शिक्षण निरिक्षक यांचे कार्यालय,
उत्तर, दक्षिण, पश्चिम, विभाग.

**विषय:-राज्यातील सर्व प्राथमिक/माध्यमिक शाळांमध्ये विपश्यना साधना प्रशिक्षणाचा मित्र उपक्रम राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना सन २०१३-१४**

**संदर्भ :१) परिपत्रक क्र. संकीर्ण २०११/२९६/११/माशि-३ दि.०५/१०/२०११.**
**२) परिपत्रक क्र. संकीर्ण २०११/२९६/११/माशि-३ दि. २७/०१/२०१२.**
**३) परिपत्रक क्र. संकीर्ण २०१२/विपश्यना/१५क(८)/६६०१/**

उपरोक्त शासन परिपत्रकान्वये शालेय शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या सर्व शासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित खाजगी शाळा तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्याकरीता आनापना ध्यान साधना प्रशिक्षण वर्ग सुरु करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद या संस्थेला मित्र उपक्रमाचे मुख्य प्राधिकरण (Nodal Agency) म्हणून निश्चित करण्यात आले आहे.

अनापना ध्यानसाधना म्हणजे स्वत:च्या श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रीत करुन मनावर नियंत्रण ठेवण्याची साधना होय. या उपक्रमास MITRA (Mind in training for Right awareness) या नावाने संबोधण्यात येते. सदरचा उपक्रम राज्यातील इयत्ता पाचवी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या मानसिक व बैध्दिक वाढीकरीता उपयुक्त आहे.




Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

या उपक्रमांतर्गत शिक्षकांना ११ दिवसाचे विपश्यना प्रशिक्षण व एक दिवसाचे MITRA प्रकल्पाबाबतचे मार्गदर्शन असे एकूण १२ दिवसाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. हे प्रशिक्षण विपश्यना केद्राने निश्चित केलेल्या सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभागांच्या वसतीगृहांमध्ये तसेच नियमित विपश्यना केंद्राच्या ठिकाणी देण्यात येत आहे. निवड झालेल्या शिक्षकांनी या प्रशिक्षणाकरीता निश्चित केलेल्या ठिकाणी उपस्थित राहावयाचे आहे.

**या प्रशिक्षणाच्या कार्यवाहीसाठी पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत.**

(अ) विपश्यना तसेच आनापन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षकांनी शाळेतील उर्वरीत शिक्षकांना व मुख्याध्यापकांना अंदाजे ३ तासांचे प्रशिक्षण द्यावयाचे आहे. - -

(ब) विद्यार्थ्यांनी दररोज परिपाठाच्या वेळी व शाळा संपण्यापूर्वी आनापान प्रशिक्षणाचा १० मिनिटांचा सराव करावयाचा आहे.

(क) हे प्रशिक्षण मे, २०१३ ते जून २०१३ या कालावधीत किंवा प्रशिक्षण केंद्राच्या उपलब्धतेप्रमाणे करावयाचे आहे.

(ड) २ शिक्षकी शाळेतील शिक्षकांना उन्हाळयाच्या सुट्टीमध्ये प्राधान्याने प्रशिक्षण देण्यात यावे ज्यामुळे शाळा सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांची शैक्षणिक हित जोपासली जाईल.

(इ) बहु शिक्षकी शाळेतील शिक्षकाची निवड करतांना विद्यार्थ्यांचे हित विचारत घेवून प्रशिक्षणाकरीता शिक्षकांची निवड करावी.

(ई) प्रशिक्षणाकरीता शिक्षक उपस्थित राहिल्यामुळे मागे पडलेला अभ्यासक्रम जादा तास घेवून पूर्ण करावयाचा आहे.

(उ) राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय समित्यांनी विपश्ना रिसर्च इन्स्टिटयूट यांच्याशी समन्वय ठेवून प्रशिक्षणाचे आयोजन करावे.

(ऊ) या उपक्रमांतर्गत घेतलेल्या प्रशिक्षणाचा अहवाल जिल्हांनी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद व शिक्षण संचालक (प्राथ) या कार्यालयास सादर करावा.

(ए) प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षक व विद्यार्थ्यांच्या वर्तनामध्ये घडून येणाऱ्या बदलाच्या नोंदी शाळेमध्ये ठेवण्यात याव्यात.

**प्रशिक्षणाबाबत विशेष सूचना:-**

१) संपूर्ण प्रशिक्षणाचा कालावधी १२ दिवसांचा आहे १२ व्या दिवशी सकाळी ५.०० वाजता प्रशिक्षण संपेल.

२) पहिल्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत शिबीरास पोहचणे आवश्यक आहे.

३) १२ व्या दिवशी सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मित्र उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या आनापना ध्यानसाधनेबद्दल कार्यशाळा घेतली जाईल.

४) शिबीर केंद्रावर निवास, भोजन, ध्यान, साधना इत्यादी बाबतची परिपूर्ण व्यवस्था करण्यात आली आहे.

५) सैल कपडे, मुखमार्जन साहित्य, साबण आदि अत्यावश्यक वैयक्तीक साहित्य प्रशिक्षणार्थींना सोबत आणावयाचे आहे.

६) निवास स्थळी मोबाईल, पेन, कागद, पुस्तके अथवा ध्यान साधनेपासून चित्त विचलीत करणारे कोणतेही साहित्य प्रशिक्षणार्थीला सोबत बाळगता येणार नाही.

७) हे साहित्य प्रशिक्षण आयोजकाकडे शिबीर कालावधीत सुरक्षित ठेवण्याकरीता जमा करण्याची व्यवस्था केलेली आहे.

८) विपश्यना शिबीर केंद्राच्या आचारसंहितेबाबतची माहिती http://www.vridhamma.org/Code-of-Discipline या वेबसाईटवर ठेवण्यात आली आहे. वरील आचार संहिता काळजीपूर्वक अभ्यासून त्याप्रमाणे प्रशिक्षणार्थींनी आपले आचरण ठेवणे बंधनकारक आहे. याबाबतची विस्तृत माहिती वेबसाईट www.vridhamma.org वर उपलब्ध आहे.

९) आचार संहितेमध्ये प्रामुख्याने शिबीर तारखेच्या पूर्व संध्येपासून (रात्री ८.०० पासून) अंतीम दिवसापर्यंत मौन पाळणे आवश्यक आहे.

१०) प्रशिक्षण स्थळी आचार्य देतील त्या सूचनांचे काटेकोर पालन प्रशिक्षणार्थ्यांना करावे लागेल.

११) प्रशिक्षण कालावधीमध्ये शांततेचे सर्व कार्यक्रमात शिस्तीचे व शांततेचे पालन करणे आवश्यक आहे.

१२) प्रशिक्षण झालेल्या व्यक्ती वगळून इतर व्यक्ती प्रशिक्षणासाठी पाठविण्यात याव्यात.

१३) आपल्याकडे उपलब्ध तरतुदीनुसार प्रशिक्षणार्थींची संख्या ठरवावी.

१४) उपस्थित असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची यादी तसेच प्रति प्रशिक्षणार्थी रुपये २००/- प्रति दिन याप्रमाणे झालेल्या खर्चाची माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सादर करावी.

१५) यादी प्राप्त झाल्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्रशिक्षणाकरीता प्रति दिन प्रति व्यक्ती रु. २०० याप्रमाणे १० दिवसाकरीता रु. २०००/- देणगी विपश्यना ध्यानसाधना केंद्रास देण्यात यावी.

१६) सदरील देणगीची रक्कम सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत उपलब्ध व्यवस्थापन या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून अथवा शिक्षक प्रशिक्षणा अंतर्गत शिल्लक तरतूदीमधून धनादेशाद्वारे संबधित प्रशिक्षण केंद्रास अदा करावा.

१७) प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात यावे.

१८) प्रशिक्षणाकरीता उपस्थित शिक्षकास/अधिकाऱ्यास नियमाप्रमाणे प्रवासभत्ता अनुज्ञेय राहिल.

१९) विपश्यना साधना केंद्राने प्राप्त देणगी मुल्यांची पावती शिक्षणाधिकारी (प्राथ) यांना देण्यात यावी.

२०) प्रशिक्षणामध्ये झालेल्या प्रगतीचा मासिक अहवाल सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये वेळोवेळी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेस सादर करावा.

| अ. क्र. | जिल्ह्यांचे नाव | प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षकांची संख्या | | | विद्यार्थ्यांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राथमिक | माध्यमिक | एकूण | प्राथमिक | माध्यमिक | एकूण |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |

सन २०१३-१४ यावर्षी प्रशिक्षण द्यावयाच्या शिक्षकांची जिल्हा व केंद्रनिहाय संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | केंद्रसंख्या | केंद्रसंख्या x ३ = एकूण प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|
| १. | नंदुरबार | ११४ | ३४२ |
| २. | धुळे | १०८ | ३२४ |
| ३. | जळगाव | १८४ | ५५२ |
| ४. | बुलढाणा | १४२ | ४२६ |
| ५. | अकोला | ९७ | २९१ |
| ६. | वाशीम | ७८ | २३४ |
| ७. | अमरावती | १७५ | ५२५ |
| ८. | वर्धा | ८८ | २६४ |
| ९. | नागपूर | १९९ | ५९७ |
| १०. | भंडारा | ८० | २४० |
| ११. | गोंदिया | १०१ | ३०३ |
| १२. | गडचिरोली | १३२ | ३९६ |
| १३. | चंद्रपूर | १५० | ४५० |
| १४. | नांदेड | २३३ | ६९९ |
| १५ | हिंगोली | ८५ | २५५ |
| १६. | परभणी | ११४ | ३४२ |
| १७. | जालना | १४२ | ४२६ |
| १८. | औरंगाबाद | २१० | ६३० |
| १९. | नाशिक | ३१३ | ९३९ |
| २०. | ठाणे | ३६९ | ११०७ |
| २१. | मुंबई उपनगरे | ३९ | ११७ |
| २२. | मुंबई | १४६ | ४३८ |
| २३. | रायगड | २२८ | ६८४ |
| २४. | पुणे | ३७५ | ११२५ |
| २५. | अहमदनगर | २९० | ८७० |
| २६. | बीड | २०३ | ६०९ |
| २७. | लातुर | १६३ | ४८९ |
| २८. | उस्मानाबाद | ११५ | ३४५ |
| २९. | सोलापूर | २८० | ८४० |

| अ.क्र. | जिल्हा | केंद्रसंख्या | केंद्रसंख्या x ३ = एकूण प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|
| ३०. | सातारा | २३२ | ६९६ |
| ३१. | रत्नागिरी | २५१ | ७५३ |
| ३२. | सिंधुदूर्ग | १४४ | ४३२ |
| ३३. | कोल्हापूर | २१७ | ६५१ |
| ३४. | सांगली | १६५ | ४९५ |
| ३५. | यवतमाळ | २०८ | ६२४ |
| | **एकूण...** | **६१७०** | **१८५१०** |

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन आपल्या जिल्ह्यांतील संबंधित प्रशिक्षण चांगल्या प्रकारे पार पाडण्याच्या दृष्टीने सर्तक रहावे व वेळोवेळी अहवाल सादर करण्यात यावा.

**राज्य प्रकल्प संचालक**
**म.प्रा.शि.प.,मुंबई.**

**प्रत माहितीस्तव सादर:-**

**१) डॉ.पी.एस.मीना अतिरिक्त मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई**
**२) श्री.एस.एस. शिंदे, सह आयुक्त, मुंबई, महानगरपालिका.**
**३) शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे.**
**४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे.**
**५) शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.**

**प्रत उचित कार्यवाहीसाठी:-**

**१) विपश्यना रिसर्च इन्स्टिटयुट/विपश्यना ॲकॅडमी, धम्मगिरी, इगतपुरी.**

**प्रत माहितीस्तव सस्नेह:-**

**१) श्री.ज.मो. अभ्यंकर, निवृत्त, राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप, मुंबई.**